दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १४२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१५ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com




# तळा येथे गोहत्या करणाऱ्या १२ आरोपींना अटक

## आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यात गोहत्या करण्यात आल्याची घटना घडली असून १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की तळा तालुक्यातील मौजे कळमशेत गावाच्या हद्दीत अब्दुरम मुल्ला याच्या फार्म हाऊसवर गुरांच्या गोठ्यात गोहत्या करण्यात आल्याची माहिती तळा पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता त्याठिकाणी गोहत्या झाल्याचे त्यांच्या निर्दशनास आले.

पोलिसांनी यामध्ये सहभागी आरोपी असीम अब्दुरम मुल्ला, जावेद करदेकर, परवेज अजीज कडू, असिफ जलील फटाकरे, मोहिन मुदाद मियाँ, रिझवान रफिक टोळकर, परवेझ महमदखान पठाण, महमद हनिफ सत्तार गोलंदाज, शाकीब सलाम अरब, मनान बशीर फटाकरे, माजिद उमर गोठेकर, अफताफ नजीर पठाण (अल्पवयीन) सर्व राहणार वरचा मोहल्ला. यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर महाप्राणी संरक्षण अधिनियम १९७६ ५, ५ (ल) ६,९ (–) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटनेचा पुढील तपास उपविभागीय पो–लीस अधीकारी प्रविण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय. शिवराज खराडे हे करीत आहेत.

# पोलादपूर तालुक्यातील वाकण धामणेचीवाडी-सानेवाडी येथे घरे अन् शेतजमिनींना तडे

## १८ ठिकाणी कोसळल्या दरडी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यामध्ये १२ वाड्या असलेल्या वाकण ग्रमपंचायतीच्या हद्दीत तब्बल १८ ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना दिसून येत आहेत. वाकण ग्रमपंचायत हद्दीतील धामणेची वाडी आणि सानेवाडी येथे जमिनीला आणि घरांना भेगा पडलेल्या दिसून येत आहेत. येथील ग्रमस्थांना कापडे येथील तात्याबा साने या रेशन दुकानदारांच्या घरी स्थलांतरित करण्यात आले आहे.

या ग्रमस्थांच्या चाळीसहून अधिक म्हशी, गाय, बैल, वासरू या पशुधनासाठी मोकळ्या जमिनीवर कोंडवाडा बांधण्यात येऊन ठेवण्यात आले आहे. वाकणमधील धामणेची वाडी–सानेवाडी येथे जमिनीला पडलेल्या भेगा थेट आंबेनळी घाटातील कुंभळवणे गावाच्या डोंगरापर्यंत पोहोचल्या आहेत. घरातील भिती आणि जमिनीला पडलेल्या भेगा घराबाहेरील जमीनीलाही दूरवर पडल्या असल्याचे दिसून येत आहेत. या भेगा डोंगरदरीत मोठ्या आकाराच्या दरडी कोसळल्यानंतर तयार झाल्या असाव्यात, असा अंदाज ग्रमस्थ व्यक्त करीत आहेत.

मात्र,जमिनीला पडलेल्या भेगा आणि त्याच भेगांचे शेवटचे टोक दरीमध्ये दरडी कोसळण्याचे कारण असल्यास भुवैज्ञानिक व भुगर्भतज्ञांकडून याबाबत पाहणी करून वाकण ग्रमपंचायतीच्या हद्दीतील धामणेचीवाडी–सानेवाडीतील ग्रमस्थांचे कायमचे स्थलांतरण करुन पुनर्वसन करण्यासंदर्भात शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. पोलादपूर प्रभारी तहसीलदार समीर देसाई यांनी, २७ ते ३० ऑगस्ट २०२१ कालावधीत भुगर्भ वैज्ञानिकांचे पथक पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी येणार असून त्यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शासनाकडे स्थलांतर व पुनर्वसनासाठी शिफारस करण्यात येईल, अशी माहिती प्रस्तुत प्रतिनिधीला दिली.

# राज्यातील ७८ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना पदक जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पोलीस सेवेतील योगदानासाठी महाराष्ट्रातील ७८ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोलीस शौर्य पदक, राष्ट्रपती पोलीस पदक आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठीच्या पदकानं गौरवण्यात येणार आहे. दरम्यान महाराष्ट्रातील पदक विजेत्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे.



महाराष्ट्र पोलीस दलाचा आम्हाला अभिमान आहे. पोलीस दलाच्या ब्रिद वाक्याला जागून, या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावून महाराष्ट्राच्या गौरवात भर घातली, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र पोलीस दलातील या अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने देशातील १,३८० पदक विजेत्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची यादी जाहीर केली. यात महाराष्ट्रातील तीन अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट सेवेकरिता 'राष्ट्रपती पोलीस पदक', २५ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी 'पोलीस शौर्य पदक', तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ४५ अधिकारी–कर्मचाऱ्यांनी 'पोलीस पदक' आणि ११ पोलीस अधिकाऱ्यांनी 'उत्कृष्ट तपासासाठीचे केंद्रीय गृहमंत्री पदक' जाहीर झाले आहे. याशिवाय राज्याच्या अग्निशमन दलातील आठ अग्निशमन अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'अग्निशमन सेवा शौर्य पदक' जाहीर झाले आहे.

राष्ट्रपती पोलीस पदक, पोलीस शौर्यपदक, गुणवत्तापूर्ण सेवापदक जाहीर झालेल्या महाराष्ट्र पोलीस दलातील ७८ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केलं आहे. कायदा–सुव्यवस्था, गुप्तवार्ता, गुन्ह्यांचा तपास, आपत्कालीन परिस्थितीतील मदतकार्य, नागरिकांशी संवाद–सौहार्द अशा अनेक आघाड्यांवर जगातील सर्वोत्कृष्ट पोलीस दलांपैकी असलेल्या महाराष्ट्र पोलिसांनी त्यांची क्षमता, गुणवत्ता, दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. पदकविजेत्या पोलिसांचा राज्याला अभिमान आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांचं कौतुक केलं असून यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. उल्लेखनीय सेवेबद्दल अग्निशमनसेवा शौर्यपदक विजेत्या राज्यातील आठ अग्निशमन अधिकारी–कर्मचाऱ्यांचेही उपमुख्यमंत्र्यांनी विशेष अभिनंदन केलं आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात आज कोरोनामुळे १३४ जणांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात दैनंदिन कोरोना बाधित रुग्णांची संख्या काही दिवसांपासून दहा हजारांच्या आत येऊ लागली आहे. आज ५,७८७ नवीन रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर ५ हजार ३५२ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहे. राज्यात आतापर्यंत ६१ लाख ८६ हजार २२३ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.८४ टक्के आहे. राज्यात आज १३४ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्याचा मृत्यूदर २.११ टक्के झाला आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ५, ०७,५९, ७६७ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६३,८७, ८६३ (१३.५८ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आ–हेत. सध्या राज्यात ३,७३,८१२ व्यक्ती होम क्वारंटाईनमध्ये आहेत तर २, ५१२व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. मुंबईत गेल्या २४ तासात २६२ कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ३२३ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. मुंबईत आतापर्यंत ७,१७,७७५ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. मुंबईचा रिकव्हरी रेट ९७ टक्के झाला आहे. तर मुंबईत गेल्या २४ तासात ६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या मुंबईत २,८७९ सक्रिय रुग्ण आ–हेत. तर रुग्ण दुपटीचा दर १८६० दिवसांवर गेला आहे.

केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतीरादित्य सिंधिया यांनी दिलेल्या आश्वासनानुसार...

# १६ ऑगस्ट रोजी होणारे काम बंद आंदोलन तूर्त स्थगित

## भुमीपुत्र व प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाची केंद्राने घेतली दखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे या मागणीचा आग्रह धरण्यासाठी दि. १३ ऑगस्ट रोजी केंद्रीय नागरी उड्डान मंत्री ज्योतीरादित्य सिंधिया यांची तसेच केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांची दिल्ली येथे कृती समितीच्या शिष्टमंडळाने भेट घेतली आणि स्थानिक प्रकल्पग्रस्त व भुमीपुत्रांच्या भावना त्यांच्या कानी घातल्या. यावेळी केंद्रीय मंत्री मा.ना. श्री. ज्योतीरादित्य सिंधिया यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनानुसार दिनांक १६ ऑगस्टपासून होणारे विमानतळाचे काम बंद आंदोलन तूर्त स्थगित करण्यात येत आहे, अशी माहिती लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने आज(दि. १४) पत्रकार परिषदेत देण्यात आली.



पनवेल शहरातील आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेल महानगरपालिका उपमहापौर जगदीश गायकवाड, जे. डी. तांडेल, नंदराज मुंगाजी, दीपक म्हात्रे, राजेश गायकर, दिपक पाटील, मनोहर पाटील, आदी समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांना सविस्तर माहिती देताना सांगण्यात आले की, १० जून रोजी झालेले साखळी आंदोलन, २४ जूनला झालेले सिडको घेराव आंदोलन व ९ ऑगस्ट क्रांतीदिनी जिल्हया जिल्हयात, तालुका तालुक्यात व गावागावात झालेल्या प्रचंड संख्येचे मशाल मोर्चे आंदोलन या सर्व आंदोलनाची दखल घेत आणि कृती समितीच्यावतीने दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागलेच पाहिजे यासाठी पेटून उठलेल्या स्थानिक जनतेच्या भावना व आंदोलनला मिळालेला प्रचंड प्रतिसाद याची दखल केंद्राने घेतल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. तसेच राज्य सरकार सिडकोमध्ये केलेला बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा ठराव दिल्लीत पाठविलेला नाही. राज्य सरकारच्या कॅबिनेटने असा ठराव केलेलाच नसल्याचे समजते.

सदर परिस्थिती लक्षात घेता व दि. १३ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या बरोबर कृती .../२

दिबांनी दिलेल्या मार्गातून प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र एकसंघ झाला आहे. दिबांचे नाव विमानतळाला लागण्यावबरोबरच प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचे काम कृती समितीच्या माध्यमातून केले जाणार आहे. केंद्राने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, त्याचप्रमाणे राज्य सरकारनेही प्रकल्पग्रस्तांच्या भावनांचा आदर करावा.

**- दशरथ पाटील, अध्यक्ष- कृती समिती**

दिबासाहेबांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे हि भूमिका कायम ठेवत तीन वेळा आंदोलन झाले आणि या आंदोलनांना प्रतिसाद लाभला. नामदार ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रकल्पगस्त भूमिपुत्रांना आश्वस्त केले आहे. दिबासाहेबांचे नाव विमानतळाला लावण्यासाठी यापुढेही जनजागृती आणि संघर्ष करण्याची तयारी कायम राहील.

**- आमदार प्रशांत ठाकूर**

# बोर्ली-मांडला परीसरात वीजेचा खेळखंडोबा : महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र नाराजीचा सूर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टी नंतर मुरुड तालुक्यातील बोर्ली–मांडला परीसरात गेल्या दहा–बारा दिवसांपासून वीज प्रवाह वारंवार खंडित होत असल्याने महावितरण च्या कारभाराबाबत नाराजीचा सूर दिसून येत आहे.

मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टी नंतर तालुक्यासह बोर्ली–मांडला,नांदगांव–मजगांव परीसरात गेल्या दहा–बारा दिवसांपासून सातत्याने वारंवार वीज गायब होत असल्याने उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले असून महावितरण ने याभागात पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे वेळेत न करण्यात आल्याने वारंवार खंडीत वीज प्रवाहामुळे लोकांना त्रास व हाल सहन करावे लागत असल्याचे बोलले जाते आहे.

वारंवार वीज पुरवठा खंडीत होण्याच्या प्रकारामुळे नेटवर्क, सर्वर सुविधा .../२

# दरडप्रवण सांगवी गावाची पालकमंत्री यांच्याकडून पाहणी

## पुनर्वसनाचे प्रस्ताव करण्यास अधिकाऱ्यांना सूचना



**दै.रायगड नगरी । कर्जत**

तळीये येथील दरड कोसळलेल्या घटनेच्या जखमा आजही ताज्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गावांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशात कर्जत तालुक्यातील सांगवी हे गाव आता दरडप्रवण म्हणून घोषित करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी याठिकाणी भेट देऊन येथील परिस्थिती जाणून घेतली. तसेच याठिकाणच्या पुनर्वसनासाठी अधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देखील तटकरे यांनी दिले आहेत.

३० जुलै २०१४ मध्ये पुणे जिल्ह्यातील माळीण या गावावर काळाने घाला घातला होता. तर २२ जुलै २०२१ मध्ये तब्बल ६ वर्षांनी रायगड .../२

# गजानन काळेंनी भ्रष्टाचारातून कमवली करोडोंची संपत्ती : संजीवनी काळे

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

मनसेचे नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे यांच्यावर त्यांची पत्नी संजीवनी काळे यांनी गंभीर आरोप केले आहेत. तीन दिवसांपूर्वी गजानन काळे यांनी मारहाण करत आपल्यावर प्रचंड अत्याचार केला असा आरोप संजीवनी यांनी केला होता. गजानन काळे यांच्या विरोधात नेरूळ पोलिस ठाण्यात अनुसूचित जाती प्रतिबंधक कायदा आणि कौटुंबिक अत्याचार गुन्हा नोंद केला आहे. मात्र तीन



दिवस उलटून काळे यांच्यावर कारवाई होत नसल्याने संजीवनी काळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

गजानन काळे यांनी .../२

चिरनेर विभागातील शेतकरी पीक विम्यापासून वंचित

# एचडीएफसी कंपनीच्या बेपर्वाईमुळे शेतकऱ्यांना लाभ मिळत नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील खरीप हंगामात पीक विमा धारकांची संख्या वाढविण्यासाठी कृषी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. या कामी एचडीएफसी इरगो कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र एच डी एफ सी इरगो कंपनीच्या गलथान कारभारामुळे चिरनेर विभागातील शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे विम्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे व पैसे भरून देखील चिरनेर विभागातील एकाही शेतकऱ्याला मागील दोन वर्षापासून विम्याच्या रकमेचा लाभ मिळत नसल्याचे निर्दशनास आले आहे.

त्यामुळे येथील शेतकऱ्यांमधून पीक विम्यासाठी नियुक्त केलेल्या एचडीएफसी इरगो कंपनी विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वातावरणातील बदलांमुळे शेतकऱ्यांना अनेक अस्मानी संकटांचा सामना करावा लागत आहे. यासाठी आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी पंतप्रधान पीक विमा योजने अंतर्गत भात व नाचणी पिकांचा यात समावेश केला आहे.

यात पीक पेरणीपासून ते पीक .../२

# छोट्या केसांची मोठी गोष्ट

फेमिनिझम हा शब्द दक्षिण कोरियात स्त्रीहक्कांपेक्षाही पुरुषद्वेष या अर्थाने अधिक वापरला जातो. मुलींनी केस कापले, की फेमिनाइन अशा शिक्का मारला जातो. टोकियो ऑलिंपिकमध्ये तीन सुवर्णपदके जिंकणाऱ्या ॲन सॅन या तरुणीला केवळ तिच्या केसांच्या लांबीवरून छळ सोसावा लागला. आता त्याची प्रतिक्रियाही तितकीच तीव्र उमटते आहे... ऑलिम्पिकमधले सुवर्णपदक ही आपल्यासाठी नवलाई असते; त्यामुळे एखाद-दुसरे पदक मिळाले, की विजेत्याला कुठे ठेवू आणि कुठे नाही, असे आपल्याला होते. दक्षिण कोरियाच्या खेळाडूंनी या वर्षी सहा सुवर्णपदके जिंकली. त्यात ॲन सॅन या तरुणीचा पन्नास टक्के वाटा होता; परंतु तीन सुवर्णपदके पटकावणाऱ्या ॲन सॅनवर कौतुकाची फुले फार कमी उधळली गेली, टीकेचे काटेच तिच्या वाट्याला अधिक आले, तेही खेळबाह्य कारणांमुळे. या टीकेतूनच स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेण्याचीही मोठी लाट आली आणि दक्षिण कोरियाच्या सामाजिक संस्कृतीचा वेगळाच चेहरा जगापुढे आला. सोशल मीडियामुळे ज्या उलथापालथी होत आहेत, त्यातलाच हा एक प्रकार. फेमिनिझम या शब्दाला जगातील विविध संस्कृतींमध्ये अर्थाच्या वेगवेगळ्या छटा आहेत. दक्षिण कोरियामध्ये हा शब्द स्त्रीहक्क अथवा स्त्रीस्वातंत्र्यापेक्षाही पुरुषद्वेष या अर्थाने अधिक वापरला जातो. मुलींनी केस कापून छोटे केले, अथवा बॉय कट केला, की तिथे लगेच फेमिनाइन अशा शिक्का मारला जातो. अर्थात, हा वर्ग आपल्याकडील पुराणमतवाद्यांच्या जातकुळीतलाच आहे; परंतु त्याचे प्रमाण किती मोठे आहे, हे ॲन सॅनच्या निमित्ताने कळले. ॲन सॅनने टोकियो ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत पदके मिळवल्यावर, आधी तिच्या अभिनंदनाचा पूर आला. हाती धनुष्यबाण धरलेला तिचा फोटो सगळीकडे व्हायरल झाल्यावर एका पुरुष प्रशंसकाने 'फेसबुक'वर लिहिले, 'तिने तीन पदके जिंकली, हे चांगलेच आहे; परंतु तिचे केस पाहिल्यावर ती 'स्त्री स्वातंत्र्य'वाल्या महिलांपैकी असावी, असे दिसते. तसे असेल, तर मी कौतुकाचे शब्द मागे घेतो; कारण अशा महिला जगण्याच्या लायकीच्या नाहीत, असे मला वाटते.'असे कालबाह्य, बुरसटलेले किंवा पुरुषांच्या श्रेष्ठतेचा टेंभा मिरविणारे विचार जगात अनेक पुरुषांच्या मेंदूत लपून बसलेले असतात. संधी मिळताच ते बाहेर येतात. ॲनच्या केसांची चर्चा सुरू झाली आणि तिला विरोध करणारे मैदानात उतरले, अनेकांनी तिचा उद्धार सुरू केला. सोशल मीडियावर एकांगी विचार पेरणाऱ्यांच्या फौजा सगळीकडेच असतात, तशा दक्षिण कोरियातील फौजा लगेच जाग्या झाल्या. त्याच सोशल मीडियाचा वापर आता महिलाही करू शकतात, याचा बहुधा त्यांना विसर पडला; कारण ॲनला पाठिंबा देण्यासाठी अनेक मुली आणि महिला स्वतःचे केस कापून घेऊन, आपले फोटो सोशल मीडियावर टाकू लागल्या. टीकेच्या लाटेपेक्षा पाठिंब्याची लाट हळूहळू मोठी होत गेली. हॅशटॅग तयार झाले. 'मी टू' चळवळीच्या निमिताने आणि गर्भपातबंदी कायद्याविरोधात गेले दशभर दक्षिण कोरियात चळवळ सुरूच आहे, तिने या निमित्ताने पुन्हा जोर धरला. 'स्त्रीच्या शरीराचे, तिच्या वर्तनाचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न पुरुषांनी करावयाचे काही कारण नाही, आम्ही आमचे काय ते ठरवू,' असा जोरदार प्रतिहल्ला सध्या होतो आहे. या संतापाचे मूळ कोरियातील एका प्राचीन परंपरेत आहे. स्त्रीचा कमनीय बांधा हे सौंदर्याचे प्रतीक मानले जाते आणि तिची कंबर सडपातळ राहावी, म्हणून मुलीच्या कमरेला बालपणापासून एक कापड घट्ट बांधण्याची तेथे परंपरा आहे. अनेक शतकांची ही परंपरा स्त्री स्वातंत्र्याचा गळा घोटणारी आहे, असे म्हणत काही स्त्रियांनी २०१८मध्ये त्या विरोधात मोहीम उघडली. तेव्हापासून या ना त्या कारणाने महिलांच्या विविध चळवळी होत आहेत. एक नवी जाग महिला वर्गाला आली आहे. अर्थात, चळवळींमध्ये अनेकदा टोकाची भूमिका घेतली जाते; कारण या चळवळीतूनच 'मेगालिया' नामक पुरुषद्वेष्टी चळवळ जन्माला आली. या चळवळीच्या बोधचिन्हात अंगठा आणि तर्जनी जवळ जवळ धरून, छोटासा आकार दाखवण्यात आला होता. त्यातून पुरुषांना त्यांच्या लिंगाच्या आकारावरून खिजवण्यात आले आहे, असा अर्थ काढला गेला; त्यामुळे स्त्रीच्या हक्काच्या चळवळीचे रूपांतर स्त्री-पुरुष संघर्षात झाले आणि दोन्ही बाजूंकडून टोक गाठण्याची स्पर्धा सुरू झाली. गेल्या काही वर्षांत मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले, त्यांच्यातील गुणवत्ता पुढे येऊ लागली आणि पुरुषांच्या अनेक नोकऱ्या मुली पटकावू लागल्या. त्यातून तरुणांना आलेले वैफल्यही ॲनला विरोध करण्याच्या निमित्ताने दिसून येत आहे, असे अनेकांना वाटते. जातीय, धार्मिक, वांशिक संघर्षात आता ही आणखी एक भर पडली आहे. जगात सगळीकडेच सुप्त स्वरूपात हा संघर्ष असणार आहे, कुठे कमी, कुठे जास्त.

# जेएनपीटीने आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत सुरू केले महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

जेएनपीटी ने जनशिक्षण संस्थान (जेएसएस) च्या सहकार्याने महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, यांनी आज ग्रामपंचायत, नवीन शेवा येथे या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेश शरद वाघ,माजी आमदार मनोहर भोईर व जेएनपीटीचे सर्व विभागाध्यक्ष उपस्थित होते.

जेएनपीटीने आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीअंतर्गत रायगड जिल्ह्यातील १००० लाभार्थ्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधि मंजूर केला आहे. तीन महिन्यांच्या या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये महिलांचा कौशल्य विकास व त्यांना व्यावसायिक कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करण्यावर भर दिला जाईल ज्यामुळे महिलांना मुख्य प्रवाहात येण्यास आणखी मदत होईल.

या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवडलेल्या अभ्यासक्रमांमध्ये ब्युटी कल्चर आणि हेल्थ केअर, नर्सिंग होमसाठी मदतनीस, सॅनिटरी पॅड बनवणे, भाजी आणि मासे सुकवणे, वारली पेंटिंग, अगरबत्ती पॅकिंग इत्यादी कौशल्ये समाविष्ट आहेत. या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जेएनपीटीचे अध्यक्ष श्री संजय सेठी म्हणाले, बंदर परिसरातील सर्व लोक हे जेएनपीटी परिवाराचाच एक भाग आहेत आणि आम्ही आमच्या सीएसआर उपक्रमांद्वारे या भागातील लोकांची सेवा करण्यासाठी नेहमीच वचनबद्ध आहोत. या प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे महिलांना कौशल्ययुक्त बनवण्याचे आमचे ध्येय असून यादवारे महिलांना ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होवुन त्यांना उत्पन्नाचे मार्ग उपलब्ध प्राप्त होतील. आम्हाला खात्री आहे की या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महिलांच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्रोत्साहन मिळण्यासोबतच त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास सुद्धा होईल व पर्यायाने त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यास सुद्धा मदत होईल.

पहिल्या टप्प्यात, जनशिक्षण संस्थान ने जेएनपीटीच्या सहाय्याने रायगड जिल्ह्यातील ४५० लाभार्थ्यांना १८ अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले आहे व उपक्रमाच्या या टप्प्यात रायगड जिल्ह्यातील सुमारे ४०० लाभार्थ्यांना १६ वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे ज्यामध्ये उरण तालुक्यातील पाच तुकड्यांच्या समावेश आहे.

जनशिक्षण संस्थान ही कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाशी संलग्न एक स्वयंसेवी संस्था असून गेल्या १५वर्षांहून अधिक काळ कौशल्य विकास आणि रोजगार निर्मिती क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. जनशिक्षण संस्थान ने ४० हून अधिक प्रकारचे व्यावसायिक अभ्यासक्रम तयार केले असून आतापर्यंत २८००० पेक्षा जास्त उमेदवारांना प्रशिक्षण दिले आहे.

जेएनपीटी आपले सीएसआर उपक्रम अतिशय व्यवस्थित व काळजीपूर्वक निश्चित करते व बंदर परिसरातील तसेच अन्य भागातील विविध सीएसआर उपक्रमांसाठी निधीचे वाटप करते. गेल्या काही वर्षांमध्ये, जेएनपीटीने जलसंधारण आणि स्वच्छता, आरोग्य सेवा, शिक्षण, रस्ते विकास, कला व संस्कृतीस प्रोत्साहन सारख्या अनेक प्रकल्पांना सीएसआर निधि अंतर्गत सहाय्य केले आहे. असे सहाय्य करताना जेएनपीटी हे सुनिश्चित करते की हे प्रकल्प स्थानिक लोकांशी संबंधित आहेत व त्याचा समाजाला व्यापक फायदा होणार आहे.

# स्थानिक भुमीपुत्रांना नोकरीत समावून घेण्यासाठी पालकमंत्र्यांना निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । तळा**

स्वराज्य प्रतिष्ठान रायगड वतीने रायगड जिल्ह्यातील तळा येथे ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, मांदाड, महागांव, नियोजित रहाटाड, गिरणे उपकेंद्र होत असून विकासाकडे वाटचाल आहे.

तसेच काही भागांमध्ये हॉस्पिटलची सुविधा उपलब्ध होत आहेत. तिथे आपल्या स्थानिक भुमीपुत्रांना प्रथम प्राधान्य मिळावं यासाठी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा.अदितीताई तटकरे यांची भेट घेऊन राष्ट्रवादी भवन मुंबई येथे ११ऑगस्ट रोजी स्वराज्य प्रतिष्ठान रायगड संस्थापक /अध्यक्ष भास्कर भाई कारे, सहखजिनदार राजेंद्रभाई ताम्हणकर, निलेश भाई पोटले,सुरजभाई पागडे, साहिलभाई पागडेह्याच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. तळा तालुका दुर्गम डोंगराळ भागात वसलेला असून ग्रामीण भागातील जनतेचा शेती हा एकमेव व्यवसाय आहे. तालुक्यात शैक्षणिकदृष्ट्या सूखसोयी असल्याने युवा /युवतीनी उच्च शिक्षण घेतले आहे.



रोजगारा अभावी बेरोजगार झाले आहेत. हाताला काम नाही.व इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने आर्थिक दृष्ट्या विकास झाला नाही तालुक्यात विकास होत असताना स्थानिक भूमी पुत्रांना विविध क्षेत्रात प्राधान्य मिळावे. अशी मागणी स्वराज्य प्रतिष्ठान रायगड यांनी केली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## १६ ऑगस्ट रोजी होणारे काम बंद आंदोलन तूर्त स्थगित

समितीची बैठक झाली या विषयी सविस्त चर्चा करण्यात आली आणि प्रकल्पग्रस्त व भुमीपुत्रांच्या भावना कानी घालण्यात आल्या. केंद्रीय मंत्र्यांनीही या भावनेचा आदर केला. परंतु विमानतळाचे काम पूर्ण होणे हे ही प्रकल्पग्रस्त व स्थानिकांच्या दृष्टीने आवश्यक आहे. ज्या केंद्र सरकारने नामकरण करायला हवे त्याच मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचा सन्मान ठेवून दि. १६ ऑगस्ट पासून कृती समितीने पुकारलेले काम बंद आंदोलन तूर्त स्थगित करण्यात येत आहे., अशी घोषणा कृती समितीच्या वतीने आज पत्रकार परिषदेत करण्यात आली. मात्र राज्य सरकारच्या कॅबिनेटने बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा ठराव पुढे पाठविण्याचा प्रयत्न केल्यास भुमीपुत्रांचे हे आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनाच्या निमित्ताने रायगड, ठाणे, पालघर व मुंबई जिल्हयात अनेक प्रश्न समोर आले आहेत. हे प्रश्न एकत्रितरित्या सोडविण्यासाठी पावसाळ्यानंतर 'भुमीपुत्र परिषदेचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले आहे, अशीही माहिति पत्रकार परिषदेत देण्यात आली.

## बोर्ली-मांडला परीसरात वीजेचा खेळखंडोबा

मिळत नसल्याने बाध येत आहे तर काही ठिकाणी मोबाईल रेंज, बॅटरी लो मुळे कामे रखडली असून महावितरण च्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त होते आहे. महावितरण चे वीज बील ग्राहकाने वेळेत न भरल्यास भरारी पथक कारवाई करून सदर ग्राहकाची वीज जोडणी तोडून कारवाई केली जाते. वीज बील तारखेला न भरल्यास दंड आकारला जातो. वारंवार वीज प्रवाह खंडीत होऊन त्रास व हाल सहन करावे लागत असल्याने याला जबाबदार कोण ? असा सवाल ग्राहक वर्गातून विचारला जात आहे.

## गजानन काळेंनी भ्रष्टाचारातून कमवली करोडोंची संपत्ती : संजीवनी काळे

आपल्या राजकीय प्रभावाचा फायदा उचलून मोठ्या प्रमाणात काळी माया गोळा केली आहे. शिक्षण प्रवेश आणि मनपा अधिकाऱ्यांना धाक दाखवून करोडो रुपये गजानन काळे यांनी गोळा केले. याबाबत तपास होणार असेल तर आपण यंत्रणेला सगळी माहिती देण्यास तयार आहोत असेही त्यांनी सांगितले. घरात जास्त दिवस रोकड न ठेवता अन्य व्यक्तीच्या नावावर सर्व रोकड बँकेत जमा करायचा. ही रोकड घेऊन येणाऱ्या चार कार्यकर्त्यांची नावेही त्यांनी सांगितली आहेत. लाखो रुपये गोळा करून हे कार्यकर्ते घरी यायचे. एबी नावाच्या बोगस कंपनीच्या नावाने सर्व आर्थिक व्यवहार करण्यात आले आहेत. सदनिका, चार चाकी वाहने, मोबाईल अशा सर्व गोष्टींचे व्यवहार याच कंपनीच्या नावावर करण्यात आल्याचा गौप्यस्फोट संजीवनी यांनी केल्याने गजानन काळे यांच्या अडचणीत भर पडली आहे. या अनैतिक व्यवहारांना आपला विरोध असल्याने गजानन काळे दमबाजी करत असल्याचा गंभीर आरोप देखील करण्यात आला आहे. या प्रकरणी मनसेच्या नेत्यांनी साधी दखल घेतली नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पोलिसांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ होत असल्याने त्यांनी गंभीर आरोप केला. पोलीस मध्यस्थी करून प्रकरण मिटवून टाकण्यासाठी दबाव टाकत आहेत. पती पत्नीमध्ये समेट घडवून आणतो असे वरिष्ठ पोलीस अधिकारी सांगत आहेत, असं संजिवनी काळे यांनी म्हटलं. गजानन काळे यांनी राजकीय पदाचा दुरुपयोग करून केलेल्या काळ्या कमाईची माहितीच त्यांनी पत्रकारांच्या समोर मांडली. करोडो रुपयांची सदनिका घेताना एवढा पैसा आला कुठून याची चौकशी केली तरी सगळे बिग फुटेल असा गौप्स्फोट त्यांनी केला. या प्रकरणानंतर दबावामुळे आपल्याला पाठींबा देण्यास कोणीही पुढे येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. कामगार संघटनेच्या मार्फत कामगार भरती करण्यासाठी लाखो रुपये उकळण्यात आल्याचा गंभीर आरोप देखील केला आहे, असंही संजिवनी काळे यांनी म्हटलं. गेल्या चार दिवसापासून गजानन काळे यांना अटक केली जात नसल्याने भाजपाच्या नेत्या चित्रा वाघ यांनी नवी मुंबई पोलीसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणात गृहमंत्र्यांनी हस्तक्षेप करत संजीवनी काळे यांना न्याय देण्याची मागणी चित्रा वाघ यांनी केली आहे. दरम्यान सर्व आरोपांबाबत गजानन काळे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल गेली चार दिवस झाले बंद येत आहे.

## शेतकऱ्यांना लाभ मिळत नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

काढणीपर्यंतच्या कालावधीत, दरम्यान स्थानिक नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास पंतप्रधान पिक विमा योजनेचे संरक्षण करण्यासाठी सरकारी सेवा केंद्रावर चिरनेर विभागातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत आवेदन पत्र देखील मागील दोन वर्षे भरून घेतले आहेत. मात्र एचडीएफसी इरगो कंपनीच्या बेपर्वाईमुळे येथील शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे यावर्षी चिरनेर गावातील एकाही शेतकऱ्याने पिक विमा योजनेत सहभाग नोंदविला नाही. अशी माहिती चिरनेरचे कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली आहे.

## दरडप्रवण सांगवी गावाची पालकमंत्री यांच्याकडून पाहणी

जिल्ह्यात माळीण दुर्घटनेची पुनरावृत्ती घडली. तब्बल ८४ लोक येथील दरडीखाली गाडली गेली. त्यामध्ये ५३ मृतदेह सापडले मात्र उर्वरित ३१ जणांना ढिगाऱ्याखालीच श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाड तालुक्यातील तळीये दरड कोसळण्याच्या या प्रकरणाने रायगड सह महाराष्ट्र देखील हळहळला. त्यामुळे जिल्ह्यातील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गावांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. असाच पावसाळ्यात कर्जत तालुक्यातील खांडपे ग्रामपंचायत हद्दीतील सांगावी हे गाव दरडप्रवण म्हणून घोषित करण्यात आले आहे. खांडपे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे सांगवी गावाला भुस्खलनाचा धोका असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. कर्जत तालुक्यातील भारतीय भूवैज्ञानीक सर्वेक्षण विभागाने कळविले प्रमाणे भुस्खलन होणार्याल गावांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे, या अनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांनी संबंधित प्रशासकीय यंत्रनेस गावात भुस्खलनाचा धोका असल्यामुळे गावातील नागरिकांस सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची कार्यवाही करण्यास सूचित केले आहे. त्या यादीत असलेल्या सांगवी गावचे नाव असून डोंगराच्या कुशीत असलेल्या त्या डोंगरभागाची पाहणी स्थानिक ग्रामस्थ यांच्यासोबत रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी पाहणी केली होती.आपल्या गावाच्या नावाचा समावेश भूस्खनन होणाऱ्या गावात असल्याने ग्रामस्थ घाबरले आहेत. त्यामुळे संबंधित गावाची माहिती सुधाकर घारे यांनी रायगड जिल्हाच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांना दिली होती. त्यानुसार जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी शुक्रवारी सांगवी या गावाला भेट दिली. यावेळी ग्रामस्थांच्या भावना त्यांनी जाणून घेतल्या. तसेच दरडप्रवण सांगवी गाव हे पुनर्वसन करण्यासाठी साधारण ७ ते ८ एकर जागेची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने एवढी जागा उपलब्ध आहे का ? तसेच गावाच्या पुनर्वसनासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी पालकमंत्री तटकरे यांनी यावेळी दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार विक्रम देशमुख, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल घेरडीकर, गटविकास अधिकारी बालाजी पुरी, जिल्हा परिषद सदस्या रेखा देसले, कर्जत नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते शरद लाड, सरचिटणीस तानाजी चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या तालुकध्यक्ष रंजना धुळे, आदी उपस्थित होते.

# पालीतील तरुणांची भूतदया ; लंपी त्वचा रोगाने जर्जर झालेल्या जखमी वासराचे पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने वाचविले प्राण



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

संपूर्ण जिल्ह्यातील अनेक जनावरे लंपी त्वचा रोगाने ग्रासली आहेत. पालीत एक भटके वासरू या रोगाने जर्जर व जखमी झाले आहे. या वासरावर पालीतील तरुणांनी शुक्रवारी (ता.१३) पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने उपचार करून त्याचे प्राण वाचविले आहेत.

अंगातून रक्त वाहत रस्त्यावर फिरणारे हे वासरू पालीतील मंगेश लखीमळे यांना दिसले. त्यांनी शिवऋण प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष केतन म्हसके यांना ही बाब लक्षात आणून दिली. म्हसके यांनी ताबडतोब पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांना संपर्क केला. कोकरे यांनी कर्मचारी गायकवाड यांना वासरावर उपचार करण्यासाठी पाठविले.

नगरपंचायत कर्मचारी प्रवीण थळे, केतन म्हसके, मंगेश लखीमळे व गायकवाड यांनी या वासराला शोधून त्याच्या जखमांवर औषध लावले आणि त्याला लस दिली अशा प्रकारे या वासराचे प्राण वाचले. पालीतील तरुणांनी दाखविलेल्या या भूतदयेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पावसाळ्यात रस्त्यावरील बंद दिवे लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पावसाळ्यात रस्त्यावरील बंद दिवे लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी पनवेल जिल्हा काँग्रेस कंमीटीचे उपाध्यक्ष संतोष जानू चिखलकर यानी सिड़कोकडे केली आहे.

सध्या पावसाळी दिवस आहेत. त्यामुळे सिडकोच्या खाली प्लॉट्सवरती तसेच मोकळ्या जागेत भरपूर झाडी-झुडपे वाढली आहेत. त्यामुळे सरपटणाऱ्या विषारी प्राण्याचा वावर हि खूप वाढला आहे अश्या तक्रारी नागरिकांच्या वतीने येत आहेत आणि एखाद्या ठिकाणी रस्त्यावरील रात्रीचे दिवे बंद असले तर धोका अधिकच वाढून जीवितहानी होण्याची शक्यता असते. म्हणूनच काँग्रेस पक्षाच्या वतीने कामोठे शहरात अंधार मुक्त रस्ते अभियान राबवून रस्त्यावरील प्रत्येक बंद दिवा सिडको प्रशासनाच्या मदतीने पुढील १५ दिवसात सुरु करून घेण्याचे अभियान हाती घेण्यात आले आहे.

या अभियानाला सिडकोची साथ मिळून कामोठे शहरातील रस्त्यावरील सर्व बंद दिवे लवकरात लवकर सुरु करून द्यावे अशी विनंती कार्यकारी अभियंता,रायगड भवन, सिडको याना करण्यात आली आहे.

# पालदाड परिसरातील खड्डे बुझविल्याने प्रवासी वर्गाला मिळाला दिलासा

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

खांब-पालदाड-रोहे या मार्गावरील पालदाड नदी पुलाच्या रस्त्यावरील भागातील खड्डे तात्पुरत्या स्वरूपात बुझविल्याने प्रवासी वर्गाला तेवढाच दिलासा मिळाला आहे.

य भागातील रस्त्याची अवस्था पावसाळा हंगाम सुरू होण्यापूर्वीच दयनिय स्वरूपात झाली होती. परंतू संबंधितांनी याकडे लक्ष न दिल्याने सुरूवातीच्या पावसाळ्यात येथील रस्त्यावर मोठमोठाले खड्डे पडण्यास प्रारंभ झाला. मोठे पालदाड पूल ते उडदवणे गावापर्यंतचा रस्ता हा पुर्णपणे खड्डेमय झाल्याने येथून मार्गक्रमण करणे मोठे जिकरीचे होऊन बसले होते.तर पावसाचे पाणी खड्ड्यात तुंबल्याने व खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने काही बाईकस्वारांना अपघातालाही सामोरे जावे लागले आहे.येथील रस्त्याची गंभीर समस्या लक्षात घेता येथील मालसई ग्रा.पंचायतीचे वतीने या भागातील रस्त्यावर पडलेले खड्डे बुझविल्याने सद्य स्थितीत वाहनचालक व दैनंदिन प्रवासी वर्गाला सध्यातरी थोडाफार दिलासा मिळाला असल्याचे दिसून येत आहे.तर मालसई ग्रा.पंचायतीने खड्डे बुझविण्याच्या कामी चांगले योगदान दिल्याने येथून प्रवास करणारे प्रवासी व वाहनचालक यांची सध्यातरी खड्डेमय रस्त्यातून मुक्तता झाली असून सर्वांना चांगला दिलासा मिळाला असल्याचे प्रवासीवर्गातून बोलले जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सुकापूर ते नेरे रस्त्याची दुरावस्था, रस्त्याला खड्डेच खड्डे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापूर– भगतवाडी ते नेरे हा रस्ता अतिशय खराब झाला आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. खड्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणे धोकयाचे झाले आहे. हे खड्डे बुज़वून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी मनसेचे दिनेश मांडवकर, विश्वास पाटील व सामाजिक कार्यकर्ते धनंजय गोविंद पाटील यानी केली आहे.

सुकापूर– भगतवाडी आणि विहीघर ते कोप्रोली येथे रस्त्याला भरपूर खड्डे पडलेले आहेत. कदाचित यंदा पाऊस जरा जास्त प्रमाणात झाला असावा म्हणून ही शक्यता नाकारता येत नाही. येथील रस्ताच वाहुन गेला असल्याचे दिसत आहे. रस्त्यावर ठिक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार रिक्षाचालक, एसटी व इतर वाहनांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. येत्या १० सप्टेबर रोजी गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. श्री गणरायांचे आगमन घरोघरी होनार आहे. आता पावसाने बरयापैकी उसंत घेतलेली आहे. तरी गणेशोत्सवापूर्वी या रस्त्याची डागडुजी करून घ्यावी आणि दिवाळीनंतर रस्ता नवीन बनवावा अशी मागणी दिनेश काशिनाथ मांडवकर, मनसे उपतालुका अध्यक्ष, पनवेल आणि विश्वास पुंडलिक पाटील पनवेल–मनसे, नेरे विभाग अध्यक्ष, व सामाजिक कार्यकर्ते धनंजय गोविंद पाटील यानी केली आहे. या संदर्भातील निवेदन सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल याना देण्यात आले आहे. रस्त्याची डागडुजी झाली नाही तर नागरिक, ग्रामस्थ आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरेल असा ईशारा देण्यात आला आहे.



# एलपीजी गॅसची डिस्ट्रीब्यूटर शिप न देता केली सात लाख ३१ हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एलपीजी गॅसची डिस्ट्रीब्यूटर शिप न देता आकुर्ली येथे राहणाऱ्या ४८ वर्षीय महिलेची तब्बल सात लाख एकतीस हजार शंभर रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साक्षी पार्क, आकुर्ली येथे राहणाऱ्या संगीता फापाळे यांनी एलपीजी गॅस डिस्ट्रीब्यूटर साठीची जाहिरात वाचली होती. त्यानंतर त्यांनी ऑनलाईन अर्ज भरला. यावेळी सेल्स ऑफिसर सुरज आहीवले यांनी त्यांना कागदपत्रे पाठवण्यासाठी सांगितले. व ऑनलाईन अर्ज भरून २१ हजार ३०० रुपये बँकेत भरायला सांगितले. फापाळे यांनी त्यांची कागदपत्रे पाठवली व पैसे बँकेत भरले. त्यानंतर सर्टिफिकेटची फी ९७ हजार ३०० रुपये भरण्यास सांगितले. ५ जानेवारी २०२१ रोजी सुरज यांनी व्हाट्सअप मेसेज व मेलवर भारत गॅस डिस्ट्रीब्यूटरचे सर्टिफिकेट पाठवले. यावेळी फापाळे यांनी ग्रामीण भागाचे सर्टिफिकेट हवे आहे असे सांगितले. तेव्हा सुरज आहीवले यांनी भारत गॅसचे डिपॉझिट म्हणून ५ लाख रुपये व कमीत कमी ६५० गॅसच्या टाक्या घ्यावे लागतील असे सांगितले. व प्रत्येक टाकी साडे आठशे रुपये प्रमाणे पडेल व टाकीचे डिपॉझिट म्हणून पाच लाख ५५ हजार दोनशे रुपये भरावे लागतील असे सांगितले. त्यानुसार फापाळे यांनी डिपॉझिटचे पाच लाख व उर्वरित ९४ हजार ही रक्कम गॅस सिलेंडर टाकीसाठी डिपॉझिट मधील रक्कम म्हणून बँक खात्यात भरली. त्यापुढे गॅस टाकी, ऑफिस गोडाऊनचे बांधकाम यासाठी जे पैसे भरायचे होते त्यासाठी बँकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी सुरज यांना सांगितले. मात्र त्यांनी कंपनीच्या मीटिंगमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही.

संगीता फापाळे यांनीसुरज यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे संगीता फापाळे यांनी भारत गॅसचे हेड ऑफिस, मुंबई येथे चौकशी केली असता सुरज नावाचा कोणीही कर्मचारी त्यांच्याकडे काम करत नसल्याचे समजले. यावेळी त्यांनी भारत गॅस बुक खाते दाखवले असता ते भारत गॅसचे बँक खाते नसल्याचे समजले. यावेळी फसवणूक झाल्याचे फापाळे यांच्या लक्षात आले. भारत गॅसचा कर्मचारी आहे असे भासवून भारत गॅस ऑनलाईन वेबसाईट वर जाऊन अर्ज करण्यास सांगून एलपीजी डिस्ट्रीब्यूटर देतो असे सांगून फापाळे यांची सात लाख एकतीस हजार शंभर रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कामोठे वसाहतीमध्ये पोलिसांच्या नाईट गस्त वाढविण्याची शिवसेनेची पोलीस उपायुक्तांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कामोठे वसाहतीमध्ये गेल्या काही दिवसां पासून अनैतिक घटना मध्ये होताना दिसून येत आहे. या मध्ये चैन स्नैचिंग, मोटारसायकली चोरी, सायकलीच्या चोरी या सारख्या घटनामध्ये वाढ झाली आहे. त्या सोबत वसाहतीमधील रात्री च्या वेळेस अंधाराचा फायदा घेऊन मारा मारी सारख्या घटना देखील वाढू लागल्या आहे. या वाढत्या अनैतिक घटनांना आळा बसावा या साठी शहरातील, पोलीस गस्त दिवसा आणि रात्री देखील वाढवाव्या त्या मुळे पोलिसी धाक राहून शहरातील अनैतिक घटनाना आळा बसेल अशी मागणी शिवसेना शहर अध्यक्ष राकेश गोवारी यांनी निवेदनाद्वारे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या कडे केली आहे. त्या सोबत शहरात सेक्टर १९ ते २२ मधील परिसरात स्वतंत्र पोलीस चैकी उभारावी अशी मागणी गोवारी यांनी केली आहे.

कामोठे वसाहत गेल्या काही दिवसां पासून अनैतिक घटना मुळे चर्चे त आली आहे. रत्यावरून फिरणाऱ्या गर्दुल्या मुळे वसाहतीमध्ये अनैतिक घटना वाढू लागल्या आहे. हे गर्दुल्ले मोकळ्या मैदानात, पडक्या इमारतीमध्ये नशा करून रत्यावरून फिरणाऱ्या रहिवाशीयांना नाहक त्रास देत आहे. त्यामुळे मारा मार्याक सारखे प्रमाण वाढू लागले आहे. त्या सोबत एखाद्या महिन्यात चैन स्नैचिंग सारख्या घटना घडत आहे. व घरफोडी आणि वाहन चोरी सारख्या घटना घडू लागल्या आहे. या घटना ना आळा बसावा आणि पोलिसांवर विश्वा स बसावा म्हणून कामोठे वसाहतीमध्ये पोलीस गस्त वाढवण्यात यावी त्या सोबत सेक्टर १९ परिसरात विस्टा कॉर्नर येथे स्वतंत्र पोलीस चैकी उभा करावी ज्यामुळे शहरात रत्यावर राजरोस फिरून दहशत माजवणार्यो अनैतिक तत्वांना आळा बसला जाईल अश्या मागणीचे एक निवेदन शिवसेनेचे कामोठे शाखा प्रमुख राकेश गोवारी यांनी पनवेल चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांना दिले आहे.

या वेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील आणि अन्य शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# आदीवासी विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा परिषद सदस्य विलास फडके यांच्याकडुन आदीवासी, करवलीवाडी शाळा हरिग्राम येथील आदीवासी विद्यार्थ्यांना शाळेय दप्तर वाटप करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष पाटील, अरुण पाटील, बाळाराम पारधी, आदीवाशी वाडीतील जेष्ठ नेते बबन पारधी, जिल्हा परिषद शिक्षक सुधीर डागंरकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सारिका पाटील, व विद्यार्थी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.हंस रियार्टी तर्फे कर्ता : श्री.उमाकांत अजित वैष्णव यांनी कै. गणपत मऱ्या थळी (मयत) यांचे वारस कै.दादाजी गणपत थळी (मयत) यांचे वारस १) श्रीमती.निर्मला दादाजी थळी २) श्री.कल्पेश दादाजी थळी ३) सौ.कामिनी किरण तांडेल ४) सौ.ज्योती विकास कडवे यांच्याकडून त्यांच्या मालकीची खालील वर्णनाच्या जमिनीच्या संपादनापोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे मिळणारा भूखंड खरेदी केलेला असून तो सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू संपादीत जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**संपादीत जमिनीचे वर्णन**
**मौजे : म्हातवली, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नांव | युनिट केस / मिळकत नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गुंठे |
|---|---|---|---|---|
| म्हातवली | ७ | २९ | २ | ०–१३–८ |
| | | ३२ | ६ | ०–८–१२ |
| | | ३३ | १ | ०–१४–० |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/–**
**अशिलातर्फे वकील**
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर, सेक्टर १ ए,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.आशिष पनवेलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.९९५/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.८/१०/२१

कै.कृष्णा हरिश्चंद्र कोळी मयत यांचे वारस
१) श्रीमती.प्रणाली कृष्णा कोळी
वय : ३०, व्यवसाय : गृहिणी
२) कुमारी.युविका कृष्णा कोळी
वय : ५, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.घर नं.१७० ए कोपरागाव हनुमान मंदिर
सेक्टर १० खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.२
यांची अज्ञानपालनकर्ता म्हणून आई — अर्जदार क्र.१ व २
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.कृष्णा हरिश्चंद्र कोळी (मयत) यांचे वारस अर्जदार क्र.१ ह्या त्यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही त्यांची मुलगी आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.कृष्णा हरिश्चंद्र कोळी यांचा मृत्यू दि.१९/१०/२०२० रोजी निरोजन ब्रेन आणि स्पेन इन्टिटुत प्लॉट नं.१९ सेक्टर ४० नवी मुंबई येथे निधन झाले.

**कै.कृष्णा हरिश्चंद्र कोळी यांची मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| गाव | रस्ता नाव | सिटी सर्व्हे | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ | तालुका जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| खारघर | कोपरा | १० | १७० अ | आरसीसी दुसरा माळा | ८१३ चौ.फूट | पनवेल रायगड |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# अज्ञात इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओवे कॅम्प कडे जाणाऱ्या कच्च्या मातीच्या रस्त्यावर हजरत आमिरशहा रहमतुल्ला अली दर्गाच्या समोर रस्त्याच्या बाजूला, खारघर येथे एका ४० ते ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडून आला आहे. खारघर पोलीस या इसमाच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. त्याच्या डोक्याचे केस काळे–पांढरे व बारीक, दाढीमिशी विरळ बारीक, चेहरा गोल, रंग सावळा आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील श्री.राघो जानू पाटील, यांचे नावे असलेल्या ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकत आम्ही कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८९/९ | ०–०५–०० | ०.३७ | श्री.राघो जानू पाटील |
| उपरोक्त वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे. | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे क्षेत्र हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वर नमूद मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तरी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे व्यवहार पूर्ण करू व मागाहून आलेली तक्रार आमचेवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे.

पनवेल
दि.१४/०८/२०२१

**सही/–**
**श्री.विनोद कृष्णा घरत**
**मु.खुटुकबांधण ओवे, पो.खारघर,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१०**
**मो.नं.९७६९३८८०८०**

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट / लबडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.९१६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०९/२१

१) श्री.मारुती नारायण भद्रीके
वय : ६१ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.घर नं.१६२, पेण मार्ग, मु.लाडीवली,
पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी कै.साळुबाई उर्फ सखुबाई नारायण भद्रीके ही दि.१४/१०/२०१४ रोजी मरण पावले असून, कै.साळुबाई उर्फ सखुबाई नारायण भद्रीके यांच्या मालकीच्या पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय. डी.सी. करिता ॲक्वीझिशन केस नं.LAQ/SR-1035/1036 अन्वये संपादीत करण्यात आली आहेत.

**२) मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | आकार रु.पै. | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४ | २ अ | ०–७५–५ | ५–५७ | ५५,३३७.२७/– |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी.ने सदर मयत साळुबाई उर्फ सखुबाई नारायण भद्रीके यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत साळुबाई उर्फ सखुबाई नारायण भद्रीके हिचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१४ माहे ८ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# रोहिणी गावातील ग्रामस्थांनी ३ कि.मी.पायी चालत केली पूरग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

२२ जुलैला झालेल्या अतिवष्टीमुळे कोकणात महापूर आला. त्यात कोकणात सर्वत्र दरडी कोसळल्या.एक पाऊल माणूस म्हणून माणुसकीसाठी या विचाराने प्रेरीत होऊन पूरग्रस्त बांधवांसाठी एक हात मदतीचा म्हणून रोहिणी गावं ग्रामस्थ विकास मंडळ स्थानिक व मुंबई मंडळाने पुढे करायचा ठरवला. आणि मदत गोळा करायचा सुरवात केली. ती झाली सुध्दा ती जमा मदत महाड तालुक्यातील वांद्रे कोडं गावात पिंपळवाडी गावात शेंडगे वाडी व बौद्ध वाडी या ठिकाणी अन्नधान्य किट,नवीन साड्या,सर्व वृध्द मातांना नववारी व रुमाल देण्यात आले.

पिंपळवाडी गावात रोहिणी ग्रामस्थांनी स्वतःच्या डोक्यावर कित्स घेऊन खाच– खळग्यातून पाया वाट करत पोचले या गावाचा संपर्क इतर गावांशी जवळ जवळ १२ दिवस तुटला अजुनही रस्त्याचं काम चालू आहे.सर्व ग्रामस्थ सांगत होते की तुम्ही पहिले आहात ज्यांनी आमच्या पर्यंत ही मदत पोचवली. वांद्रे कोडं व पिंपळवाडी ग्रामस्थांनी रोहिणी गावं ग्रामस्थ मंडळाचे आभार मानले व पुढील वाटचलीसाठी शुभेच्छा दिल्या.

गावचे अध्यक्ष सुनील पाटील, सेक्रेटरी महिंद्र पाटील, कार्यकर्ते हरिश्चंद्र नाक्ती यांनी सर्व तरुणांनी समाधान व्यक्त करून हि मदत खऱ्या अर्थाने गर्जूनपर्यंत पोचल्याचे समाधान व्यक्त केले.

वांद्रे कोडं व पिंपळवाडी ग्रामस्थांचे ही सेवा करण्याची संधी दिल्या बद्द्ल आभार मानले. ज्यांनी ह्या मोहिमेमध्ये स्वतःच्या परीने आर्थिक व वस्तू स्वरुपात मदत व सहकार्य केले अश्या सर्वांचे आभार मानले.व या पुढेही रोहिणी गावच्या माध्यमातून असेच सामाजिक कार्य हाती घेतले जाईल असे आश्वासन देण्यात मंडळामार्फत आले.

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१७९/२०२१
नि.नं.११/ड
ने.ता.७/०९/२१

१) श्री.सॅलमन बॅन्जामीन भालकर
वय : ८२ वर्षे, धंदा : निवृत्त
२) श्री.डेव्हीड बॅन्जामीन भालकर
वय : ७५ वर्षे, धंदा : निवृत्त
३) श्री.मेनाशे बॅन्जामीन भालकर
वय : ७० वर्षे, धंदा : निवृत्त
४) श्रीमती.रतन शिमखा झुलकर
उर्फ रतन बॅन्जामीन भालकर
वय : ६८ वर्षे, धंदा : निवृत्त
५) श्रीमती.शेगुल्ला वाकुळकर उर्फ
शिमखा बॅन्जामीन भालकर
वय : ६६ वर्षे, धंदा : निवृत्त
६) श्री.रुवेन बॅन्जामीन भालकर
वय : ६६ वर्षे, धंदा : निवृत्त
१ ते ६ तर्फे अखत्यारी
श्री.उदय शंकर संबारे
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.एफ–७०२, इम्पायर स्क्वेर,
चिंचवड, पुणे ४११०१९ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील म्हणजेच मयत कै.बॅन्जामीन सॅमसेन भालकर हे इस्त्राईल या देशात दि.०३/०९/२००० रोजी मयत झाले असून, त्यांच्या मालकीची शेतजमीन मौजे : आकुलवाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील शेतजमीन मिळकत आहे. तीचे खालीलप्रमाणे वर्णन

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट / सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| आकुलवाडी | १३० | ०–९०–००<br>पो.ख. ०–०७–०० | २.२५ |
| आकुलवाडी | १३७/१/ब | ०–२५–०२ | ४.४६ |

अर्जदारांचे वकील कै.बॅन्जामीन सॅमसेन भालकर यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.बॅन्जामीन सॅमसेन भालकर यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.बॅन्जामीन सॅमसेन भालकर यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदारांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१३/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.मुजावर सो

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७७१/२०२१
नि.नं.१२/ड
ने.ता.१७/०९/२१

१) नरेश कृष्णा ठाकूर
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
२) उमेश कृष्णा ठाकूर
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
३) सौ.हर्षला सुनील पवार
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
कृष्णा ठाकूर, श्री हिनगिरी को.हौ.सो.,
प्लॉट नं.११९/१, रुम नं.१,
तळमजला, डायमंड पार्क जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.निर्जला विजय ठाकूर
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
विजय रंगनाथ ठाकूर, ८ चंदा गौरी,
नगर जवळ, ओमकार नगर चौपडा,
जळगाव, ता.जळगाव
५) सौ.उज्वला किशोरकुमार पवार
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
प्लॉट नं.४०२, गोविंद निरमन
मुंबई पुणे रोड, गार्डन हॉटेल,
पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ यांची आई कै.मंगला कृष्णा ठाकूर ह्या दि.२९/०३/२०२१ रोजी सिवील हॉस्पिटल, नाशिक, ता.जि.नाशिक येथे मयत झाल्या आहेत. कै.मंगला कृष्णा ठाकूर यांच्या ताबेकब्जातील सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकती**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नावडे | नावडे फेज–२ | १५ | ४९९.९७ चौ.मी. |

सदरच्या मिळकती ह्या मे.एफ.एस.के. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे डायरेक्टर सदरुद्दीन बशर खान यांच्याकडून दि.०१/०३/२०२१ रोजी त्रिपक्षीय कराराने मे.श्री गणेश बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्रीमती.मंदा रवींद्र बुधवंत, २) श्री.गिरीश कृष्णा खुटारकर, ३) श्रीमती.मंगळ महादेव अव्हाड, ४) श्री.हेमंत शांताराम दरे, ५) श्री.नितराज मनोहर खुटारकर, ६) श्री.रोहन हरिश्चंद्र भोईर, ७) श्रीमती.मंगला कृष्णा ठाकूर, ८) श्रीमती.शर्मिला यशवंत बुधवंत यांनी विकत घेतली होती. सदर मिळकतीत कै.मंगला कृष्णा ठाकूर यांचा ८ वा हिस्सा आहे. तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.मंगला कृष्णा ठाकूर यांचे वारसदार या नात्याने कै.मंगला कृष्णा ठाकूर यांचे सिडकोकडून बांधकाम परवानगी तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.मंगला कृष्णा ठाकूर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१४/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पनवेल शिवसेनेकडून पुरग्रस्तांना आर्थिक मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नुकत्याच आलेल्या महापुराचा फटका कोकणतील खेड शहराला बसला असून मोठ्या प्रमाणात या ठिकाणाच्या रहिवाशांचे नुकसान झाले होते. त्यांना मदतीचा हात म्हणून पनवेल शिवसेनेकडून आर्थिक मदत देण्यात आली.

पनवेल शिवसेना विभागप्रमुख सुजन मुसलोंडकर यांनी खेड शहरातील अनेक कुटुंबियांतील लोकांना मदतीचा हात दिला. यावेळी त्यांना शहरातील मंजिरी काणे यांच्या घराची पडझड झाल्याचे कळताच त्यांनी त्या ठिकाणी जावून आर्थिक मदत केली. तसेच याबाबत शिवसेना आ.योगेश कदम यांची भेट घेवून काणे कुटुंबियांची व्यथा त्यांच्यासमोर मांडली. यावेळी आ.योगेश कदम यांनी या कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

## पनवेल परिसरात दोन ठिकाणी लागल्या आगी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी लागलेल्या आगीत जिवीतहानी झाली नसली तरी वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली आहे.

कामोठे येथील एम जी एम रुग्णालयातील यू पी एस सी विभागात रात्रीच्या सुमारास आग लागण्याची घटना घडली. आगीमुळे मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या धुरामुळे रुग्णालयात दाखल काही रुग्णांना त्रास झाल्याने रुग्णांना तात्काळ इतर विभागात हलवण्यात आले. घटनास्थळी पोहोचलेल्या कळंबोली अग्निशमन दलाने परस्थिती नियंत्रणात आणल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली. तर दुसर्याय घटनेत पनवेल शहरातील महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्समधील मीटर केबिनमध्ये शॉक सर्कीटमुळे आग लागून १२ मीटर जळाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहोचून आग त्यांनी आटोक्यात आणली आहे. सदर आग ही शॉक सर्कीटमुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# टपाल नाक्यावरील वाहतूक कोंडी फुटणार ; वाहतूक पोलीस व व्यापाऱ्यांची संयुक्त बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण नाका व टपाल नाक्यावरील होणाऱ्या वाहतूक कोंडीचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक विभागाचे व.पो.नि अभिजित मोहिते यांनी उरण नाका व टपाल नाका येथील व्यापाऱ्यांची संयुक्त बैठक त्यांच्या दालनात घेण्यात आली. यावेळी येत्या चार दिवसात पाहणी दौरा करून व्यापार्यांचा माल घेऊन येणारे अवजड वाहनांचे शहरामध्ये प्रवेशासंबधी नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी या बैठकीत ठरले. यावेळी पनवेल शहर वाहतूक शाखेचे व.पो.नि अभिजित मोहिते, व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी विनोद वेरा, मनसुख सीधर यांच्यासह इतर व्यापारी व वाहतूक कर्मचारी उपस्थित होते.



उरण नाका परिसरात ते टपाल नाका परिसरात अतिशय मोठी खाऊक, किरकोळमध्ये किराणा, कडधान्य, ज्वलेर्स मोठ-मोठ्या दुकाने आहेतच त्याचबरोबर एमजीएम रोडवर सुध्दा नामांकित ज्वलेर्सने शोरूम थाटले आहेत. दिवसेदिवस या दुकानांची संख्या वाढत चालली आहे. त्याचबरोबर ग्राहक खरेदी करण्याकरीता पनवेलला येतात. विशेषता सण उत्सवामध्ये या दुकानांमध्ये गर्दी असते. तसेच मोठमोठ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. शहरात अवजड वाहनांना प्रवेश बंदी असताना देखील व्यापारी आपला माल अवजड वाहनातून आण-तात. त्यामुळे उरण नाका, टपालनाका, पंचरत्न परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. रस्ता अरुंद असल्याने अवजड वाहनांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवासी मात्र प्रचंड त्रस्त झाले होते. याबाबत अनेक तक्रारी वाहतूक विभागाकडे प्राप्त झाले आहेत. या अनुषंगाने पोलीस उपायुक्त वाहतूक, सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित मोहिते यांनी बुधवारी पनवेल शहरातील टपालनाका येथील व्यापाऱ्याच्या प्रतिनिधी सोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यापाऱ्यांना आपले अवजड वाहन शहरात येण्यासाठी कोणती वेळ देण्यात यावी, त्यानुसार दिलेल्या वेळेमध्ये व्यापारी माल खाली करू शकतात. तसेच वन वे करण्याबाबत चर्चा झाली. यावेळी मोहिते यांनी दुपारी २ ते ४ वाजेपर्यत अवजड वाहनांना प्रवेश द्यावा असे व्यापाऱ्यांना सुचविले. याबाबत व्यापाऱ्यांनी १७ तारखेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशाबाबत आपली भूमिका किंवा काही सूचना असतील तर वाहतूक विभागाला कळवावे. असे सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर वाहतूक पो-लीस व व्यापारी हे या प्रश्नाअबाबत एक सयुक्तिक पाहणी दौरा करणार आहेत. यावेळी मुख्य निर्णय घेण्यात येणार आहे.

## चांदेपट्टी ग्रामस्थांचे तातडीने तात्पुरते पुनर्वसन करणार : तहसीलदार

### चांदेपट्टी भागाचा जिऑलॉजिकल सर्वे करणार

**दै.रायगड नगरी । पेण**

दरड व भूस्खलनाची भीती असलेल्या पेण तालुक्यातील चांदेपट्टी गावातील डोंगरानजिक असलेल्या १० घरातील ग्रामस्थांचे तातडीने तात्पुरते पुनर्वसन करणार असल्याची माहिती पेणच्या तहसीलदार डॉ.अरुणा जाधव यांनी दिली. तसेच संपूर्ण चांदेपट्टी गावाचा जिऑलॉजिकल सर्वे करण्यात येणार आहे. जिऑलॉजिकल सर्वेच्या अह-वाला नंतर योग्यती उपाययोजना करण्यात येईल अशीही माहिती तहसीलदार जाधव यांनी दिली.

पेण तालुक्यातील चांदेपट्टी या दुर्गम भागातील ग्रामस्थांवर दरड व भूस्खलनाची टांगती तलवार असल्याने या गावातील ७० कुटुंबातील सुमारे ४०० ग्रामस्थ भीतीच्या छायेखाली जगत आहेत. यासंदर्भात येथील ग्रामस्थांनी रायगड जिल्हाधिकारी, पेण प्रांताधिकारी, तहसीलदार यांना निवेदन देऊन पुनर्वसनाची मागणी केली होती. या अनुषंगाने तहसीलदार डॉ.अरुणा जाधव यांच्यासह मंडळ अधिकारी एम.आर.पाटील, तलाठी किशोर पाटील, प्रभारी गटविकास अधिकारी एम.एन. गडरी, कृषी अधिकारी रोकडे, वनक्षेत्रपाल कुलदीप पाटकर, वनपाल के.जे.चौधरी, जी.पी. हाडकर, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील यांच्यासह वडखळ विभागातील वन कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी स्थानिक ग्रामस्थ महेश भिकावले, भरत शिंदे, राजेश्री शिंदे, मधुकर भिकावले, पांडुरंग दळवी यांनी डोंगरावरून मातीचं भूस्खलन होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. संपूर्ण गावाचे पुनर्वसन व्हावे यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन ग्रामपंचायतीमध्ये या बाबतचा ठराव पारित केला आहे.

## माथेरान मधील गरजवंत दिव्यांगांना उपलब्ध होणार रोजगाराच्या संधी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपालिकेने येथील दिव्यांग व महिला बचत गटांमधील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्द व्हाव्यात ह्या करिता येथील कपाडिया मार्केट येथील गाळे उपलब्द करून देण्याचा महत्वाचा निर्णय घेतला असून ह्या मुळे येथील महिला व दिव्यांग व्यक्तींना रोजगाराची दारे खुली होणार आहेत.

माथेरान मधील शिवसेनेच्या नगरसेविका ऋतुजा प्रधान यांनी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांना लेखी पत्र देऊन महिला बचत गटातील महिला व दिव्यांग व्यक्तींसाठी कायमस्वरूपी रोजगार उपलब्द व्हावा ह्या करिता जागा मिळाव्यात अशी मागणी केली होती त्यावर निर्णय घेताना नगराध्यक्षणी नुकतेच नूतनीकरण होत असलेल्या कपाडिया मार्केट येथे माथेरान मधील महिला बचतगट व दिव्यांग व्यक्तींसाठी गाळे उपलब्द करून देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे त्यामुळे माथेरांमधील अनेक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत तसेच गेल्या अनेक वर्षांपासून येथील दिव्यांग व्यक्तींची रोजगारासाठी जागा उपलब्द व्हावी अशी मागणी होती ती ही आता पूर्ण होणार असल्याने त्यांनाही दिलासा मिळणार आहे ,ह्या महत्वपूर्ण निर्णयामुळे येथील महिला व दिव्यांग व्यक्तींच्या कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण असून हे गाळे लवकरच जे खरोखरच गरजवंत आणि कष्टाळू आहेत अशांना कुठल्याही



प्रकारचा दुजाभाव न करता वाटप व्हावे ह्याची सर्वजण वाट पाहत आहेत.

## पोलादपूर-घागरकोंड येथील ओंकार उतेकर याचा जागतिक गोफण स्पर्धेसाठी भारतीय संघात समावेश

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील घागरकोंड येथे कृषी पर्यटनासाठी फार्महाऊस आणि शेळीपालन करून तरुणांना शेतकरी व मावळ्यांच्या जीवनपद्धतीचे आकर्षण निर्माण करणारा उच्चविद्याविभूषित आणि परदेशात नोकरी करून आपल्या वडिलांच्या मुळगावी परतलेल्या ओंकार उतेकर या तरुणाची जागतिक गोफण स्पर्धेसाठी भारतीय संघात १४ जणांच्या संघात निवड झाली आहे.



स्पेन देशात होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक चणचण भासत असल्याने ओंकार उतेकर याने मदतीचे आवाहन केले आहे. पोलादपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून एक सुसंस्कृत उच्च विद्याविभूषित नम्र तरुण शिवकालीन युध्दकलांची प्रात्यक्षिके दाखवित प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना या युध्दकलांचे प्रशिक्षण देत असल्याने त्या तरुणाबाबत सर्वत्र उत्कंठा अन् उत्सुकता वाटत आहे.

वडील मुंबई पोलिसांत अधिकारी असल्याने जन्म मुंबईत झाला अन् बीकॉम आणि एमबीए करून दुबई येथे काही वर्षे नोकरी करुन परतल्यानंतर ओंकार याला मुळ गावाची साद ऐकू आली. महाविद्यालयीन काळात बॉक्सिंग खेळात नैपुण्य प्राप्त करणाऱ्या ओंकार उतेकर याला छत्रपती शिवाजी महाराज आणि नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीमध्ये घागरकोंड येथे वडीलांचे मुळ गांव असल्याने लाठी-काठी-बनाटी, तलवारबाजी आणि गोफण गलोलीस-रखे शिवकालीन युध्दकलेचे मर्दानी खेळ लिलया आत्मसात झाले आणि त्याने या युध्दकलेचा प्रसार सुरू केला. याचदरम्यान, ओंकार याचा हातखंडा असलेल्या गोफण खेळात त्याने एकाग्रता पणाला लावून भारताच्या गोफण संघात १४ जणांमध्ये स्थानही मिळविले.

येत्या १४ ते १७ ऑक्टोबरपर्यंत स्पेन देशात होणाऱ्या या वर्ल्ड स्लिगिंग स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मोठा आर्थिक खर्च असताना ओंकार याने दुबईतून आल्यानंतर सगळी जमापुंजी शेळी पालन व पशू पालन करून मर्दानी खेळांचा प्रसार करण्यासह कृषी पर्यटनासाठी गुंतवली असल्याने आता स्पेन देशात जाऊन स्लिगिंग चॅम्पियन स्पर्धेत सहभागी होत भारतासाठी एक पदक आणण्याची पक्की खात्री असलेल्या ओंकार उतेकर याला आर्थिक निकड भासत आहे. आता शिवकालीन युध्दकलांचा प्रचार, प्रसार व प्रात्यक्षिके पाहणाऱ्या इतिहासप्रेमींना ओंकार उतेकर याने या स्पेन दौऱ्यासाठी मदतीचे आवाहन केले आहे.

## उतेखोलगांव ८८ ग्रामस्थांचे यशस्वी लसीकरण तर अजुनही अनेक प्रतिक्षेत

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव उतेखोलगांवचे नगरसेवक जयंत बोडेरे यांनी निजामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर झिउर रेहमान यांची भेट घेऊन उतेखोलगावातील लसिकरण न झालेल्या जवळपास १७५ नागरिकांची यादी सादर केली त्यावेळी ७५ ऑनलाईन डोसची व्यवस्था केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात आली. त्याप्रमाणे शनिवार दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता उतेखोलच्या मोने सार्वजनिक सभागृहात सन्मित्र मंडळाच्या सदस्यांनी मेहनत घेऊन आदल्या दिवशीच ऑनलाईन नोंदणी केलेल्या एकुण ८८ ग्रामस्थांचे यशस्वीपणे लसिकरण करण्यात आले.

ही लसिकरण मोहीम राबविण्यासाठी निजामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका सिस्टर सिमा रमेश कोंडविलकर व मदतनिस समिक्षा शैलेंद्र पारखे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रशांत पाटील तसेच उतेखोलगांव अंगणवाडी सेविका रजनी रमेश मढवी यांनी विशेष मेहनत घेतली तर ऑनलाईन नोंदणीच काम उतेखोलची श्रुती प्रकाश मोरे हीने पाहीले यावेळी आरोग्यसेवक बि. जी. कदम यांची विशेष उपस्थिती होती.

विशेष म्हणजे गडबड गोंधळ न होता, शिस्तीचे पालन करीत चार तासातच ही लसिकरण मोहीम पार पाडणाऱ्या निजामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या या सर्व सेवकांना उतेखोलगांवचे नगरसेवक जयंत बोडेरे व सन्मित्र मंडळा तर्फे पुष्पगुच्छ देऊन यथोचित स्वागत करुन, त्यांनी लसिकरण यशस्वी केल्या बद्दल धन्यवाद देण्यात आले. अजुनही जवळपास दोनअडीचशे लोकांचे लसिकरण बाकी असुन आणखी डोस उपलब्ध करुन दिल्यास पुन्हा एकदोन वेळस या ठिकाणी शिबीर राबविल्यास उतेखोल गावात शंभर टक्के लसिकरणाचे लक्षपूर्ण होईल.

## टेम्पोच्या धडकेने २ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव टेम्पोच्या धडकेने मोटार सायकलवरील आई व मुलगा जखमी झाल्याची घटना तळोजा फेज-१ येथून तळोजा फेज-२ कडे जाणार्याल ब्रीज क्रॉस करून उजव्या बाजूला वळल्यानंतर असलेल्या रस्त्यावर घडली आहे.

सऊद मोहम्मद हुसेन शेख (३१) हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकलवरून त्याच्या आईला घेवून वरील ठिकाणावरुन जात असताना टेम्पो चालकाने पुढील बाजूस येवून धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते दोघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर टेम्पो चालक पसार झाला असून त्याचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत.


